# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.५६** **विषय क्रमांक - ५६**

दिनांक : १९/०८ /२०२४ विभाग : आस्थापना विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपलिकेत्मधील पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान बाबत..

---*---

**ठराव :-** अहमदनगर महानगरपलिकेमधील पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणे बाबत अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा.क्र.१३/श्रमिक/२०२४ दि.२५/०६/२०२४ अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देउन **१**.दि.०१/११/२०२४ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०२३-२४ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% दराने बोनस म्हणून दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.**२**.महानगरपालिकेतील सर्व कायम,रोजंदारी व मानधनावरील कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रू.२०,०००/- (अक्षरी रू.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.अशी मागणी केली.या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. सदरच्या बैठकीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सन २०२३-२४ मध्ये आस्थापना कायमसुचीवरील कार्यरत १६०० कर्मचारी असून अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदाना करीता रक्कम रूपये २ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित असून अहमदनगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त प्रत्येकी रक्कम रूपये ११ हजार या प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेस व या कामी येणा-या खर्चास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा यास मंजुरी देत आहे.

**निर्णय:-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/ - | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहमदनगर महानगरपालिका, | अहमदनगर महानगरपालिका, |

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.५७** **विषय क्रमांक - ५७**

दिनांक : १९/०८ /२०२४ विभाग : आरोग्य विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** जन्म मृत्यू नोंदणी रिव्हॅम सी.आर.एस. प्रणालीकरिता प्रभाग निहाय उपनिबंधक नेमणे बाबत

**---*---**

**ठराव :-**

संगणक प्रणालीवर जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदी घेणे व मान्यतेस्तव निबंधक यांना सादर करणे, नोंदणीकृत घटनांची नांवे लावणे तसेच नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेल्या व निबंधकांची मान्यता मिळालेल्या जन्म-मृत्यू घटनांचा दाखला काढणे ही कामे करण्यासाठी रिव्हॅम सी.आर.एस. पोर्टल या संगणक प्रणालीवर ४ स्वतंत्र डाटा एन्टी ऑपरेटर यांची लॉगिंग आयडी तयार करून ऑन लाईन नोंदणी बाबत कार्यवाही चालू आहे.

तथापी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी अहमदनगर महानगरपालिकेचा विस्तार एकूण ४ प्रभाग समिती क्षेत्रात असल्याने ४ प्रभाग समिती कार्यालया मार्फत सदरचे कामकाज करण्याचे योजिले आहे. यापुर्वी या सभेने ठराव क्र.३७ व ३८ दिनांक १५/१०/२०१३ अन्वये महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचा एकुण ३२०५ पदांच्या आकृती बंधास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरच्या अकृतीबंधामध्ये सर्व प्रशासकीय कामकाजाचे योग्य नियोजन व विकेंद्रीकरण करणेसाठी शहराचे एकुण चार प्रभागामध्ये विभाजन करून त्या प्रत्येक प्रभागासाठी एक असे एकुण चार प्रभाग अधिकारी यांच्या आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक अमपा -२०१२ /प्र.क्र.-३०१ (भाग -२) /नवि -२५ दिनांक ६ फेब्रवारी २०१६ अन्वये मान्यता शासनाने प्रदान केली आहे.

सबब जन्म- मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये कलम ७(५)मधील तरतुदीनुसार मुख्यनिबंधकाच्या पुर्व मान्यतेने निबंधकास दुय्यम निबंधकाची नियुक्ती करून त्यांच्याकडे आपल्या अधिकारीतेतील विनिर्दिष्ट क्षेत्रांच्या संबंधातील आपले कोणतेही किंवा सर्व अधिकार आणि कर्तव्य सोपविता येतील अशी तरतुद आहे..

तरी या तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील चार प्रभाग अधिकारी उप निबंधक जन्म - मृत्यु म्हणून त्यांचे प्रभागाचे कार्यक्षेत्रात सर्व निबंधकाचे अधिकार वापरणेस व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे उपनिबंधक म्हणून नेमणे करीता पाठविणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देतआहे.

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/ - | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहमदनगर महानगरपालिका, | अहमदनगर महानगरपालिका, |